पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ७८ /२०२३ दि. ११/०५/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत कोळसेवाडी वाहतूक उप विभाग हद्दीतील डोंबिवली MIDC अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरणाचे काम चालू आहे. तसेच मानपाडा चौक ते सागाव या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरणाचे काम चालू असल्याने सदरचा रस्ता वाहतुकीस बंद केलेला असून कल्याण, उल्हासनगर, कल्याण पूर्व परिसरातून डोबिवली पूर्व, पश्चिम, PNT कॉलनी, साईबाबा सागाव, नांदिवली स्वामी समर्थ मठ, नांदिवली टेकडी येथे जाणाऱ्या सर्व वाहनधारक आपली वाहने पिंपळेश्वर हॉटेल येथून उजव्या बाजूस वळण घेवून पिपळेश्वर मंदिर – भारत गॅस गाडाऊन – अंफिता कन्स्ट्रक्शन MIDC रोड – टेम्पो चौक – MIDC सोनारपाडा रोड – साईबाबा सागाव येथून इच्छीत स्थळी जातील. पिंपळेश्वर महादेव मंदिर समोरील रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करण्यात आलेले असून पिंपळेश्वर महादेव मंदिर बाजूने कल्याण शिळ रोडलगत सर्व्हिस रोड दरम्यान रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण शिळ रोडने डोंबिवली पूर्व–पश्चिम कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **पिंपळेश्वर चौक** येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सोनारपाडा चौक रॉयल वाईन्स समोरून सर्व्हिस रोडने ए–१ आर्क वेल्ड कंपनीचे रस्त्याने टेम्पो चौक साईबाबा सागाव मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) डोंबिवली पूर्व–पश्चिम येथील झिन्नत कंपनी कडून कल्याण शिळ रोड व कल्याण उल्हासनगर कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना पिंपळेश्वर मंदिराचे उजव्या बाजूस **MIDC चौक** येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची वाहने पिंपळेश्वर मंदिराचे उजव्या बाजूस MIDC चौक येथून उजव्या बाजूस वळण घेवून कोमल कंपनी, सुपर कास्टींग कंपनी समोरून सर्व्हिस रोडने मानपाडा चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

ब) सदरची वाहने पिंपळेश्वर मंदिराचे उजव्या बाजूस MIDC चौक येथून डाव्या बाजूस वळण घेवून भारत गॅस कंपनी गोडाऊन समोरून MIDC रोडने रॉयल वाईन्स सोनारपाडा चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसुचना दि. १२/०५/२०२३ रोजी पासून वर नमूद काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. ~~विनयकुमार मे. राठोड~~ )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.